11/02/2022 ~~02/02/2022~~ 939
4:20 pm ~~6:42 pm~~

व्यसनमुक्ती धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या क्षेत्रात मौलिक काम करीत असलेल्या व्यसनमुक्ती केंद्राना महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला,उपचार व पुनर्वसन योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
शासन निर्णय क्रमांक : डीडीपी-२०२०/प्र.क्र.१५४ /सामासु
विस्तार भवन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
**दिनांक : २ फेब्रुवारी, २०२२**

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी-२००९/प्र.क्र.१४९/ सुधार-१, दि. १७.०८.२०११
२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी-२०१२/प्र.क्र. ५७७/ सामासु, दि. २९.३.२०१३
३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. डीडीपी-२०१८/प्र.क्र. ३१२/ सामासु, दि. २०.०९.२०१९

<u>प्रस्तावना</u>:-

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मधील सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शक तत्व समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार राज्याचे व्यसनमुक्ती धोरण निश्चित करण्यात आले असून या विभागाच्या संदर्भ १ येथील दिनांक १७ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे व्यसनमुक्ती धोरण जाहिर करण्यात आले आहे. या धोरणाचे प्रभावीपणे काम करणाऱ्या व्यसनमुक्ती केंद्राचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी केंद्राच्या धर्तीवर व्यसनमुक्ती केंद्राना अर्थसहाय्य करणारी महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन योजना सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ येथील दि. २९ मार्च,२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक महसूल विभागातून २ याप्रमाणे व्यसनमुक्ती क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या एकूण १२ व्यसनमुक्ती संस्थांना प्रत्येकी रु. ११.०० लाख इतके अर्थसहाय्य देण्याची योजना आहे. राज्यात कार्यरत असणाऱ्या व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन केंद्रामार्फत प्रचार व प्रसार करणाऱ्या सेवाभावी संस्थांना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>**शासन निर्णय :**</u>

व्यसनमुक्ती धोरणाची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यासाठी राज्यात कार्यरत असणाऱ्या व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन केंद्रामार्फत प्रचार व प्रसार करणाऱ्या सेवाभावी संस्थांना महात्मा गांधी व्यसनमुक्ती सल्ला, उपचार व पुनर्वसन योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यासाठी मा. मंत्री (सा.न्या.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवड समितीच्या दि. २६/०३/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत, आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर, विचारविनिमय करुन १२ व्यसनमुक्ती केंद्रांना प्रत्येकी

रु. ११.०० लाख अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.पात्र संस्थांची यादी परिशिष्ट-अ मध्ये दर्शविण्य आली आहे.

२. या प्रयोजनाकरीता आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोि करण्यात येत आहे.

३. सदर प्रयोजनासाठी येणारा खर्च, सन २०२१ - २०२२ या आर्थिक वर्षातील मागणी क्र. एन-३, २२ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण-१०५, दारुबंदी, (०२) स्वयंसेवी संघटनांना सहाय्य, (०२) ( व्यसनाधीन व्यक्तींसाठी अंमली पदार्थ सेवन विरोधी मोहीम चालविणे, त्यांच्यावर उपचार करणे, व्यसनाधं व्यक्तींचे पुनर्वसन करणे याकरिता स्वयंसेवी संघटनांना वित्तीय सहाय्य, (२२३५ १७५५) ३१-सहाय्यक अनुद (वेतनेत्तर) या लेखाशिर्षातंर्गत भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सोबत :- परिशिष्ट "अ"

( राजेश मंजरेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (सा.न्या) यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (सा.न्या.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
निवड नस्ती, सामासु.

(शा. नि. क्र. डीडीपी २०२० /प्र.क्र. १५४ / सामासु, दि. २ फेब्रुवारी,२०२२)

परिशिष्ट – अ

(सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील लाभार्थ्यांची यादी)

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | पुणे | सांगली | निर्मल फाउंडेशन, ता. मिरज. जि.सांगली |
| २ | पुणे | कोल्हापूर | राजर्षी छत्रपती शाहू महाराज सामाजिक संघ, कोडोली, पांडुरंग तात्या कॉलनी, महापुरे हॉस्पिटल ,ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर . |
| ३ | मुंबई | ठाणे | मोहासुर व्यसनमुक्ती संस्था, ठाणे, ३/ श्रीनाथ अपार्टमेंट, देवेंद्र इंडस्ट्रिज पाठीमागे,लोकमान्य नगर, पाडा नं. २, ठाणे. |
| ४ | मुंबई | रायगड | सुरभी स्वयंसेवी संस्था, सदाशिव कॉम्प्लेक्स, ३ रा मजला, रुम नं ३०१,चेंढरे ,अलिबाग, जि. रायगड. |
| ५ | नाशिक | नंदुरबार | नेटवर्क ऑफ बाय पिपल लिव्हींग विथ एच.आय.व्ही. /एडस संस्था नंदूरबार,देशदूत कार्यालयाजवळ, देसाईपूरा, नंदुरबार. |
| ६ | नाशिक | धुळे | जोगाईमाता सांस्कृतिक सामाजिक शैक्षणिक मंडळ, मु.पो.कापडणे, ता.जि. धुळे |
| ७ | औरंगाबाद | नांदेड | लक्ष्मीबाई मागासवर्गीय महिला मंडळ, बहाद्दरपुरा, ता. कंधार, जि. नांदेड |
| ८ | औरंगाबाद | उस्मानाबाद | ज्ञान प्रसारक शिक्षण मंडळ, दिंडोरी, ता. भूम, जि. उस्मानाबाद |
| ९ | अमरावती | बुलढाणा | एकलव्य बहुउद्देशीय संस्था, मेहकर, ता.मेहकर, जि. बुलढाणा |
| १० | अमरावती | अकोला | श्री सत्यसाई सेवा सांस्कृतिक सामाजिक शैक्षणिक मंडळ, खेडगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव. |
| ११ | नागपूर | भंडारा | राजीव ग्रामीण विकास बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, वरठी, ता. मोहाडी, जि. भंडारा |
| १२ | नागपूर | गडचिरोली | आरोग्य प्रबोधिनी, आमगाव बुट्टी, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली. |

(राजेश भांजरेकर)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन